

ह्या डोंगरांची ओळख लहानपणी पुस्तकातून, शिवाजी
महाराजांच्या किल्ल्यांमधून व नंतर व्यवसायामुळे झाली. क्षणिक
आनंदासाठी डोंगरात फिरणं आणि तिथं स्थायिक असणं ह्यात
मोठा फरक आहे. अशाच एका गावात आणि त्यानिमित्ताने पूर्ण
डोंगररांगेत फिरण्याचा, अभ्यास करण्याचा योग आला.
त्याची ही एक छोटी गोष्ट ...
एक गाव डोंगरातलं
ता. क. : गावाचं नाव तुमच्या मनातलं सह्याद्रीतील
तुम्ही बघितलेलं कोणतंही !
मानसी करंदीकर

एक गाव, दूर डोंगरात. पूर्वी नदीच्या काठी वसलेलं, नंतर धरणामुळे पुनर्वसन झालेलं. कुठून आली ही माणसं, कधी स्थायिक झाली ?

गप्पांमधून मिळालेली माहिती ३००-४०० वर्षापूर्वी पर्यंत जाते. शिवरायांचे मावळे, सरदार, ह्याच खोऱ्यांमधले, लहान वाडी - वस्तीत राहणारे. लहानसे गड, टेहळणी गड ह्या परिसरात आहेत. ह्या गडावर वास्तव्य करायला यायची पायवाट नदीकाठाने जात असे म्हणतात. तसंही त्याकाळी डोंगर जंगलानं भरलेले होते. पण त्याही आधीपासून थोडीफार वस्ती इथे होती.

ह्या डोंगरात वर्षभर पाणी आणि शेती ह्याचीच कमी ! थोडे वर्षभर जीवंत राहणारे झरे आहेत पण शेतीला उपयोग मर्यादित. इथली भौगोलिक रचना, कठीण बसाल्टचा खडक पाणी मुरू देत नाही. शेतीच कमी तर लोकसंख्या कशी वाढणार, त्यामुळे कायमच इथे विरळ लोकवस्ती. मुख्य गाव नदीकाठी, थोडी भातशेती पावसाच्या पाण्यावर, काही विहिरी नदीच्या पाण्याने पुनर्भरण होणाऱ्या, काही प्रमाणात नाचणी, वरी, सावा अशी भरड धान्य उतारावर. बास. बाकीची मदार रानभाज्या, रानफळं ह्यावर. पाण्याचा स्त्रोत

ठरवी लोकं किती मावणार एका वस्तीत. काही वाड्या तर अगदी एक-दोन घरांच्या कारण तिथला झरा कमी पाणी देणारा, एक झरा गुरांकरता, एक माणसाकरता. वस्ती सखल भाग किंवा डोंगरात सपाटीवर, थोडी शेती जिथे सपाटी मिळेल किंवा करता येईल तिथे छोट्या ओहोळांवर बांध घालून. एवढाच काय तो माणसाचा भाग, बाकी जंगल.

तशी ही डोंगररांग बनायला सुरुवात सुमारे १० कोटी वर्षापूर्वी झाली. एक भिंतच जणू, आलेल्या ओल्या ढगांना रोखणारी. ज्यामुळे ह्या रांगेवर चार महिने पडतो प्रचंड पाऊस.

इथला हा पाऊस, वारा ह्यात तग धरणारी, जमीन आच्छादणारी जंगलं, त्यात असलेली विविधता, तयार होणारी लाल माती, वाहणारे ओढे, उगम पावणाऱ्या नद्या. ह्याचं एक अजब रसायन तयार होतं, जिथे माणसाचा वावर अवघड होऊन बसतो.

वृक्षांची दाटी दिसत असली तरी ते वाढायला लागणारा वेळ खूप जास्ती, २-३ मीटर चे घेर असलेले वृक्ष व्हायला ६००-८०० वर्ष. अशी ही दाट जंगलं आज काहीच भागात

शिल्लक आहेत, साधारण ५-१० टक्के भूभागावर. बाकी जमीन उजाड कधी झाली ?

साधारण १८६० पासून इथली जंगलं तोडून उपयोगी काही उगवण्याची सुरुवात झाली. चहा, कॉफी, भरड धान्य, लाकूड ह्याकरता लागवड सुरु केली जेणेकरून सरकार दरबारी उत्पन्न जमा होईल. जितकं रान तोडेल, तितकी जमीन त्या माणसाची असा सोप्पा हिशोब सुरु केला गेला. एकेका कुटुंबाच्या नावे कित्येक एकर जमीन झाली. आणि काही वर्षात मूळची जंगलं संपली. थोडी शिल्लक होती लोकांच्या श्रद्धेचा भाग असलेल्या देवरायात आणि काही न पोचू शकणाऱ्या उतारांवर. पण बहुतेक उतार हळूहळू पिकांखाली आलेच. राज्यागणिक थोडेफार बदल झाले. तरीही उत्पादन आणि त्यावर अवलंबून संख्या हे मर्यादित राहिले. शेती उत्पन्न खूप मिळत नाही म्हणून अधिक भूभाग वापरावा लागला. फिरती शेती सुरु राह्यली. मूळ, मोठी खोडं कमी झाली. तरीही अख्खा प्रदेश उघडा - बोडका करण्याची क्षमता नव्हती, गरजही नव्हती. तिथे ना एक रुपयाची कमाई, ना एक रुपया खर्च करण्याची गरज. धनगर आणि शेतकरी ह्यांच्यात वस्तू विनिमय असे. अशी ही डोंगरी जीवनशैली

१९६०-७० पर्यंत राह्यली आणि डोंगर उतार थोडेफार आच्छादित राह्यले.

बदल घडला तो धरणं सुरू झाल्यावर. विस्तीर्ण जलाशयाखाली उपजाऊ जमिनी गेल्या, उतारावर अधिक शेती केली जाऊ लागली, जवळचं शहर मोठं झालं आणि रस्ता आल्याने जवळ आलं. एक मोठं लाकडाचं भांडार शहरी लोकांना उपलब्ध झालं. सोबत वाहतूक करायला ट्रक आले. आणि सुरू झाला कोळसा पाडायचा धंदा, पैसा जो इथल्या जीवनाचा आधी भागच नव्हता तो मिळू लागला. पाणी, लाकूड आणि कोळशाची गरज होती शहरी लोकांची, माध्यम झाली डोंगरी माणसं, विकली गेली नैसर्गिक संपत्ती. माती, पोषकद्रव्ये कमी झाली, पडणाऱ्या पावसाने वाहून नेली, धरणं गाळानं भरायला सुरुवात झाली. १९८० च दशक होतं इथलं सौंदर्य वापरायचं, इथला राकटपणा अनुभवायचं. गडकिल्ले फिरणं सुरू झालं होतं. १९८५-९० मधे मोजक्या दूरदृष्टी असलेल्यांनी इथे जमिनी विकत घ्यायला सुरुवात केली. इथल्या शाळा न शिकलेल्या लोकांकडून २०००-५००० रुपये एकरने जमिनी घेतल्या. डोंगरी मुलखात जिथे पाण्यासाठी वणवण, तिथे जमिनीचे इतके पैसे खूप होते

तेव्हा. शहरी माणूस डोंगरी व्हायचा प्रयत्न करत होता. गुंतवणूक, सौंदर्य, शांतता, निरनिराळी कारणं. १९९५-२००० मधे डोंगरात 'project' सुरु झाले. अजूनही डोंगरी माणसं तिथेच होती. काही प्रमाणात जमीन राखून, शेती करून होती. पाऊस नेमाने येत होता, थोडफार धान्य देत होता, बाकी उरलेला निसर्ग भाज्या फळं पुरवत होता. काही माणसं रोजगार शोधत शहरात पोचली. काही गावात शाळा पोचली. मुलं निसर्ग नाही तर पुस्तकं शिकू लागली. रस्ता पक्का झाला, दळणवळण वाढलं आणि सातबारे शहरी नावांनी भरु लागले. मिळालेला पैसा निरनिराळ्या मार्गाने संपू लागला, इथला युवक शहरात वसू लागला.

हवामान बदल जाणवायला लागला, शेती उत्पन्न भरावशाचं होईना, पैसा तर डोंगरात कधीच नव्हता फारसा. पण आता डोंगराचा वेगळा वापर करून पैसा मिळतोय हे दिसलं. विक्री, यंत्र, प्रोजेक्ट, पर्यटन, रस्ते. पैसा वळवण्यासाठी डोंगरात power game शिरला. २०१०-१५ नंतर गावी फक्त म्हातारी लोकं राह्यली, केवळ त्या परिसराचं प्रेम म्हणून. शहरी सोयी, शिक्षण, इ नसल्याने ओघ शहराकडे वाढला, मत अन् जत्रेपुरता गावदेवीचा संबंध

उरला. शहरी लोकांना मात्र डोंगर खुणावत राह्यला आणि माती उकरणारे, झाडी अजूनच नष्ट करणारे, शहर बनवणारे उपक्रम डोंगरात वाढले. हळूहळू गावचा युवकही 'development' च्या पैशामागे परतला. अर्धा शहरात, अर्धा गावात राहू लागला. रिसॉर्ट हा नवीन व्यवसाय डोंगरात सुरू झाला. शहरी लोकांना दर weekend ला नवा पर्याय मिळू लागला.

गावकरी झाले शहरी आणि शहरी झाले डोंगरी. शहरच डोंगरात जाऊन वसू लागलं.

पण डोंगरांना हे वजन सहन होतंय का. डोंगर खरं माणसाच्या वस्तीसाठी नाहीतच. तिथे ना सपाट जमीन, ना पुरेसं पाणी, ना धड शेती. डोंगराचं शहरीकरण परवडणारं नाही.

डोंगरात राहायचं तर लहान होऊनच राहावं लागतं. तिथं कष्ट आहेत. दगड मातीच्या भिंती आणि गवताची छपरं टिकतील आणि परवडतील. बाकीवर येणार बुरशी. इथे जंगलच फोफावणार, शेती प्राणी खाणार. डोंगरी इलाका माणसाच्या वावरासाठी योग्य नाही हेच दिसतंय. मोठाले प्रोजेक्ट बंद पडत चाललेत. विकणाऱ्यांनी पैसा वसूल केला,

गुंतवणूक करणारे मात्र बुडाले. बांधलेल्या घरांवर शेवाळ वाढतंय.

आता गुरं कमी झाली, शेती संपली, लाकडाची गरज उरली नाही, हळूहळू जंगल येतंय परत. काहींना ते हवय. सध्या यंत्र, शहरी साफसफाई, गुंतवणूक म्हणून घेतलेल्या जमिनी, सिमेंटची बांधकामं ह्यात थोडफार जंगल वाढतंय मधेच. २०२० नंतर आरोग्य, निसर्ग ह्याचा ओढा वाढलाय. पण वृत्ती बदलल्या आहेत. समाधान, सचोटी, प्रामाणिकपणा दुर्मिळ झालाय, निसर्गाचा वापर वाढलाय. एकीकडे निसर्गाबद्दल आत्मीयता, जागरूकता पण वाढली आहे, काही प्रमाणात कृतीत येत आहे. डोंगरी जीवनशैली बरी म्हणणारी लोकं वाढत आहेत.

पुढे काय असेल ? कुठला भार अधिक होईल ? हे काळच ठरवेल.